## प्रेसनोट दिनांक -१६/०३/१९

## चतुःश्रृंगी पोलीस ठाणे पुणे शहर

चतुःश्रृंगी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १२/३/१९ रोजी १८.१५ ते १९.१५ वा दरम्यान पाच पाडव सोसायटी जनवाडी पुणे सेथे श्रीमती.जयश्रीताई काळे संस्थापक अध्यक्षा जागृती येवा यांचे नेतृत्वाखाली श्री.विश्वास काळे विश्वस्त, रेखा बिडकर विश्वस्त, श्रीमती.मंगला पाटील विश्वस्त, जागृती सेवा,मा.श्री.भानुप्रताप बर्गे,सहा.पोलीस आयुक्त गुन्हे शाखा, मा श्री.देविदास पाटील सहा.पोलीस आयुक्त खडकी विभाग पुणे , मा श्री भास्कर जाधव वपेनि चतुःश्रृंगी पो.स्टे, सौ वैशाली गंलाडे पोनि गुन्हे, चतुःश्रृंगी पो.स्ट मा विजया कारांडे पो नि.भरोसा सेल यांचे उपस्थितीत स्वामिनी महिला मंडळ वडारवाडी पुणे महिला सुरक्षा समिती, दक्षता कमिटी, शांतता कमिटी जनवाडी, गोखलेनगर व चतुःश्रृंगी पोलीस स्अेश संयुक्त दियमान भरोसा Cops HUB कार्यक्रम पार पाडला अंदाजे जनसमुदय २०० ते २५० स्त्री ,पुरुष सदर कार्यक्रम मध्ये मा. सहा पोलीस आयुक्त श्री.मा.श्री.भानुप्रताप बर्गे आपले भाषणात म्हणाले की, मा.पोलीस आयुक्त साो यांनी पिडीत महिला,ज्येष्ठ नागरिक, लहान मुलाकरीता भरोसा सेल स्थापन केला आहे. तसेच गुन्हेगार दत्तक योजना सुरू केली आहे. दमिनी मार्शल शाळा महाविदयालय परिसरात टिंगल-टवाळी करणा-या मुलावर कारवाई करतात. श्री. भास्कर जाधव वपेनि चतुःश्रृंगी पो.स्टे, हे आपल्या भाषणात म्हणाले की, पो स्टे हद्दीत जास्तीत जास्त सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. ज्याकरीता सामजिक संघटनानी मदत करावी व महिलाख्, लहान मुले याबाबत कायदेशीर मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाचे प्रस्तावित जयश्रीताई काळे यांनी केले असुन,सौ.अनिता पवार यांनी सूत्रसंचालन केले .